**प्रेसनोट दि.१७/०३/२०१९**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**सिंहगडरोड पो.ठाणे कार्यक्षेत्रातील महिलांची बैठक घेवुन सुरक्षेबाबत केले जनजागृती**

---

दि.१६/०३/२०१९ रोजी १९.३० ते २०.०० या वेळेत मपोउनि.ए.टी.गायकवाड यांनी अभिरुची पोलीस चौकी कार्यक्षेत्रात राहणा-या महिलांची बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठकीत चेन चोरी संदर्भात घडणारे गुन्हे, सायबर क्राईम संदर्भात घडणारे गुन्हे याअनुषंगाने महिलांना प्रवास करताना अंगावरील परिधान केलेले दागिन्यांबाबत घ्यावयाचे सुरक्षेबाबत, कोणाही अनोळखी व्यक्तीस ओटीपी नंबर, बँक खाते, एटीएम कार्डचे डिटेल्स न देणेबाबत त्याअनुषंगाने घ्यावयाचे खबरदारीबाबत मार्गदर्शन केलेले आहे. तसेच कोणत्याही महिलेवर/मुलीवर कोणी इसम लैंगिक अत्याचार,विनयभंग सारखे कृत्य करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत पोलीसांना तात्काळ माहिती देणेबाबत तसेच पोलीस नियंत्रण कक्षाचे १०० नंबरवर माहिती देणेबाबत माहिती देण्यात आलेली आहे. त्यावेळी १५ ते २० महिला उपस्थित होत्या. त्यावेळी १५ ते २० महिला उपस्थित होत्या.

सदरच्या बैठकीबाबत उपस्थित महिलांनी केलेले मार्गदर्शनाबाबत समाधान व्यक्त केलेले आहे.



**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**सिंहगडरोड पो.स्टेशन,पुणे**